



दैनिक
# अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

वर्ष : ०४, अंक : २२५
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.in
Email : newsaksharaj2021@gmail.com

बुलडाणा, गुरुवार, दि.२७ मार्च २०२५


## थोडक्यात

### आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या मदत निधीसाठी विनंत्याची वेळ

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२६, छ. संभाजीनगर :** लाडकी बहीण योजनेमुळे आलेला अर्थसंकल्पावरील ताण एवढा वाढला आहे की आत्महत्याग्रसत शेतकऱ्यांना मदत म्हणून द्यायच्या एक रुपयांचे दोन कोटी ३९ लाख रुपयांची मागणी शासनाकडे वारंवार करावी लागत आहे. मराठवाड्यातील २३९ शेतकऱ्यांना एक लाख रुपयांची मदत निधी अभावी रखडली आहे.

मराठवाड्यात १०३२ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या होत्या. त्यातील ८२३ शेतकरी एक लाख रुपयांच्या मदतीस पात्र असल्याचे अहवाल जिल्हा स्तरीय समित्यांनी मंजूर केले. आतार्यंत ४८६ शेतकऱ्यांना मदत करण्यात आली. तीन कोटी १३ लाख रुपयांच्या निधीची गरज होती. त्यापैकी काही निधी मिळाला. मात्र अजून २३९ शेतकऱ्यांना मदत मिळू शकली नाही. एकूण मदतीतील केवळ ३५ हजार रुपयेच रोख मदत मिळते. उर्वरित मदत वारसाच्या नावाने अनामत म्हणून दिली जाते. अनेक जिल्ह्यात मदतीसाठी मृत शेतकऱ्यांचे नातेवाईक तहसीलदार व जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत चकरा मारत आहेत. मदतीसाठी आवश्यक निधीची मागणी केली आहे. ही मदत आली की वितरित केली जाईल असे अधिकारी सांगत आहेत.

### सांगलीत ठाकरे शिवसेनेला खिंडार

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२६, सांगली :** शिवसेना ठाकरे गटाला लागलेली गळती कमी होण्याचं नाव घेत नाही. सांगलीत शिवसेना ठाकरे गटाला खिंडार पडलं आहे. सांगली जिल्ह्यातील शिवसेना ठाकरे गटाच्या जिल्हाप्रमुखांसह ठाकरे गट शिवसेना व युवा सेनेच्या पदाधिकाऱ्यांनी उद्धव ठाकरेंची साथ सोडली आहे. सर्व पदाधिकारी एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेचा धनुष्यबाण हातात घेण्याचा निर्णय घेतला आहे.

सांगलीचे ठाकरे गटाचे जिल्हाप्रमुख संजय विभुते यांच्यासह तालुका प्रमुख, युवा सेनेचे पदाधिकारी आणि शेकडो शिवसैनिकांनी एकनाथ शिंदे यांच्या शिवसेना पक्षात प्रवेश करण्याचा निर्णय घेतला आहे. आज मुंबईमध्ये मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत रामगिरी बंगल्यावर हा पक्षप्रवेश कार्यक्रम पार पडणार आहे. यावेळी संजय विभूतेंसह सांगली जिल्ह्यातील ठाकरे गटाचे तालुकाप्रमुख, पदाधिकारी, युवा सेनेचे पदाधिकारी आणि शेकडो शिवसैनिक एकनाथ शिंदे गटात प्रवेश करणार आहेत. ठाकरे गट शिवसेनेमध्ये योग्य सन्मान मिळत नाही. त्याचबरोबर पक्ष वाढीकडे वरिष्ठांकडून दुर्लक्ष करण्यात येत आहे. त्यामुळे पक्षाचा राजीनामा देत शिवसेना शिंदे गटात प्रवेश करत असल्याची भावना संजय विभूते यांनी व्यक्त केली आहे. तर एकाच वेळी जिल्हा प्रमुखांसह, तालुकाप्रमुख, पदाधिकारी, युवा सेनेचे पदाधिकारी यांचा शिवसेनेला सोडचिट्टी देण्याच्या निर्णयामुळे जिल्ह्यातील ठाकरे गटाला मोठं खिंडार पडणार आहे.

# बुलडाण्यातील केस गळतीवर महत्वाची माहिती आली समोर

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२६, बुलडाणा :** बुलडाणा जिल्ह्यातील काही गावात नागरिकांमध्ये मोठ्या प्रमाणावर टक्कल पडत असल्याचे पुढे आले होते. या प्रकरणाची दखल केंद्र व राज्य शासनाने घेत येथे विविध तज्ज्ञांच्या समित्या पाठवल्या होत्या. परंतु अद्यापही केस गळतीवर सरकारकडून स्पष्टीकरण आले नसल्याचा आरोप महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केला आहे. या भागातील रेशनच्या गव्हात आढळलेल्या अपायकारक घटकावरही त्यांनी भाष्य केले आहे.

डिसेंबरच्या पंधरवड्यात बुलडाणा जिल्ह्यातील तीन तालुक्यातील १९ गावात केस गळतीमुळे टक्कल पडण्याचे प्रकार पुढे आले. त्याचे शास्त्रीय कारण सरकार देत नाही. आता सरकार केस परत येत असल्याचे सांगते.

परंतु कारण देत नसल्याने यासाठी कोणते तेल वापरले असे विचारावे का, असा सवालही हर्षवर्धन सपकाळ यांनी उपस्थित केला. ज्या भागात केस गळती झाली तो खारपाणपट्टा आहे. सरकारने चौकशी केली पण त्यासंदर्भातला आयसीएमआरचा अहवाल अजून आलेला नाही.



सरकारने आयसीएमआरकडे माणूस पाठवला नसल्याने ते अहवाल बदलण्याचा प्रयत्न करत असल्याची शंकाही सपकाळ यांनी वर्तवली. पद्मश्री डॉ. हिम्मतराव साळुबा यांच्या अहवालाबाबतही सपकाळ यांनी सांगितले.

**डॉ. हिम्मतराव बावस्कर यांच्या अहवालात काय?**

डॉक्टर आणि संशोधक पद्मश्री हिम्मतराव बावस्कर यांनी बुलढाणा परिसरातील त्वचेचे, नखाचे, मातीचे व रेशनवर वितरीत करण्यात आलेल्या गव्हाचे नमुने प्रयोगशाळेत तपासून अहवाल सरकारला दिला. हा प्रकार सार्वजनिक वितरण प्रणालीतील गव्हामुळे झाल्याचे स्पष्ट झाले. या गव्हात मोठ्या प्रमाणात सेलेनियम आढळून आले आहे ते तब्बल १४ टक्के पेक्षा जास्त आहे. सेलेनियम १.९ टक्के पर्यंत हानीकारक नाही पण सेलेनियम अधिक प्रमाणात असल्यामुळे मळमळ येणे, खाज येणे, मधुमेहाच्या तक्रारी येतात, असे संशोधन आहे आणि यातून ते एका निष्कर्षापर्यंत पोहचले व तसा पत्रव्यवहार बावस्कर यांनी शासनाशी केला. पण सरकारने त्यांच्या अहवालाला केराची टोपली दाखवल्याचे सपकाळ म्हणाले.

**बावस्करांबद्दल जिल्हाधिकाऱ्यांकडून अपशब्द**

हिम्मतराव बावस्कर यांना पद्मश्री देण्याची शिफारस तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली होती. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सरकारने त्यांना पद्मश्रीचा सन्मान दिला आहे. अशा सन्माननीय बावस्कर यांना काय कळते, असे उद्दाम वक्तव्य जिल्हाधिकारी करतात. आम्ही येथे कशासाठी बसलो आहोत, असे तो बोलतात. जिल्हाधिकारी हे सरकारी नोकरी करत आहेत. त्यांना हे शोभत नाही. त्यांचा बोलवता धनी सरकार असल्याचाही आरोप सपकाळ यांनी केला.

# दुधात भेसळ करणाऱ्यांवर मकोका अंतर्गत कारवाईसाठी कायद्यात सुधारणा करणार - उपमुख्यमंत्री पवार

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२६, मुंबई :** दूध आणि तत्सम अन्नपदार्थात होणारी भेसळ ही अतिशय गंभीर बाब आहे. त्यामुळे लोकांच्या जीवाला धोका निर्माण होतो. हे खपवून घेतले जाणार नाही. दूध आणि तत्सम अन्नपदार्थांमध्ये भेसळ करणाऱ्यांवर मकोका अंतर्गत कडक कारवाई करण्यासाठी सध्याच्या कायद्यात आवश्यक त्या सुधारणा करण्यात येतील. त्यासंबंधीचा प्रस्ताव मंत्रिमंडळासमोर सादर करावा, असे निर्देश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले.

ॲनालॉग चीज हा पदार्थ राज्यात अनेक ठिकाणी ॲनालॉग पनीर या नावाने विक्री होत असल्याबाबत तसेच सोलापूर जिल्ह्यातील पंढरपूर तालुक्यातील भोसे येथे उघडकीस आलेल्या दूध भेसळीसंदर्भात विधानसभेत लक्षवेधी सूचनेवर झालेल्या चर्चेच्या वेळी दिलेल्या आश्वासनानुसार उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली विधानभवनातील समिती कक्षात बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

या बैठकीस अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ, राज्यमंत्री योगेश कदम, आमदार सुधीर मुनगंटीवार, आमदार विक्रम पाचपुते, आमदार अभिजीत पाटील, आमदार कैलास पाटील यांच्यासह अन्न व औषध प्रशासन, वैद्यकीय शिक्षण, गृह तसेच वित्त व नियोजन विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.तर सोलापूरचे जिल्हाधिकारी आणि पोलीस अधीक्षक (ग्रामीण) हे दूरदृश्य संवाद प्रणालीद्वारे उपस्थित होते.



दुधातील भेसळ तपासण्यासाठी तातडीने प्रत्येक विभागात एक प्रयोगशाळा सुरू करावी, पनीर मध्ये ॲनालॉग चीज असल्यास त्यासंबंधीची माहिती दुकानात दर्शनी भागात लावण्यासंदर्भात सूचना द्याव्यात. दूध भेसळीसंदर्भात जनजागृती करण्यात यावी, भेसळीसंदर्भात जनतेला तक्रारी नोंदविण्यासाठी टोल फ्री क्रमांक योग्य प्रकारे कार्यान्वित करावा,पोर्टल विकसित करावे असे निर्देश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले.

दुधातील भेसळ रोखण्यासाठी अन्न व औषध प्रशासन विभागाला अत्याधुनिक तंत्रज्ञान व यंत्रसामुग्री खरेदी करण्यासाठी पुरवणी मागण्यांमध्ये आणखी निधी देण्यात येईल अशी ग्वाही त्यांनी दिली. अन्न व औषध प्रशासन विभागातील अपुऱ्या मनुष्यबळाची कम तरता दूर करण्यासाठी डेअरी विभागाचे अधिकारी आणि कर्मचारी यांची सेवा घेण्यात यावी, त्यांना प्रशिक्षण देण्यात यावे असे निर्देशही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले.

सोलापूर दूधभेसळ प्रकरणातील आरोपी कोणीही, कितीही मोठे असतील तरी त्यांना लवकरात लवकर अटक करून त्यांच्यावर कडक कारवाई करावी अशा स्पष्ट सूचना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सोलापूरचे जिल्हाधिकारी आणि जिल्हा पोलीस अधीक्षक (ग्रामीण) यांना दिल्या.

# राज्यात इतर मागास व बहुजन कल्याण विभागाच्या ९८० आश्रमशाळा : मंत्री अतुल सावे

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२६, मुंबई :** राज्यात इतर मागास व बहुजन कल्याण विभागांतर्गत ९८० विजाभज खासगी अनुदानित निवासी आश्रमशाळा सुरू आहे. यामध्ये ५३० प्राथमिक शाळा, ३०२ माध्यमिक आणि १४८ उच्च माध्यमिक आश्रम शाळा आहे, अशी माहिती इतर मागास व बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे यांनी विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात दिली.

याबाबत सदस्य बबनराव लोणीकर यांनी तारांकित प्रश्न उपस्थित केला होता. प्रश्नाच्या चर्चेमध्ये सदस्य नारायण कुचे यांनी सहभाग



घेतला. या प्रश्नाच्या उत्तरात अधिक माहिती देताना मंत्री सावे म्हणाले, प्राथमिक निवासी आश्रम शाळांपैकी ५९ प्राथमिक आश्रम शाळांना १९ जुलै २०१९ रोजी बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ मधील तरतुदीनुसार इयत्ता ८ वी चा वर्ग मंजूर केला आहे. या भागात अन्य कुठलीही शाळा नसल्याने वित्त विभागातील नियमांच्या अधीन राहून ही मान्यता देण्यात आली. विभागाने २९ ऑक्टोबर २०२० नुसार प्राथमिक आश्रम शाळांनी नैसर्गिक वाढीने वर्गवाढ मिळण्याबाबत केलेल्या मागणीनुसार पायाभूत सोयी सुविधांची पूर्तता करणाऱ्या ९६ प्राथमिक आश्रम शाळांना इयत्ता ८ वी वर्ग, ६१ आश्रम शाळांना इयत्ता नववी वर्ग व त्यापुढील वर्षात त्यातील ३१ आश्रम शाळा इयत्ता दहावीचे वर्ग वित्त विभागाच्या मान्यतेच्या आधीन राहून स्वखर्चाने चालवण्याच्या अटीवर नैसर्गिक वाढीने मंजूर केले आहे.

आश्रम शाळातील निवासी विद्यार्थ्यांचे परिपोषण तसेच वेतनेतर अनुदानासाठी सन २०२४ – २५ मध्ये २५० कोटी रुपये मंजूर करण्यात आले आहे. त्यापैकी १६० कोटी इतका निधी वितरित करण्यात आलेला असून ९० कोटींच्या निधीचेही वितरण आश्रमशाळांना होणार आहे, असेही इमाव व बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे यांनी सांगितले.

# विधानसभेच्या उपाध्यक्षपदी अण्णा बनसोडे यांची निवड

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२६, मुंबई :** एक सामान्य कार्यकर्ता विधानसभेच्या उपाध्यक्ष या महत्त्वाच्या पदावर विराजमान होतो हे आपल्या संविधानाचे सामर्थ्य आहे, असे स्पष्ट करत विधानसभेच्या उपाध्यक्षपदी सदस्य अण्णा बनसोडे यांची निवड झाल्याबद्दल त्यांचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी अभिनंदन केले.

उपमुख्यमंत्री शिंदे यांनी अण्णा बनसोडे यांच्या सामाजिक व राजकीय कारकिर्दीचा उल्लेख करत सांगितले की, एक साधा कार्यकर्ता ते विधानसभेचा उपाध्यक्ष हा प्रवास प्रेरणादायी आहे. ते जनतेच्या विश्वासावर पुढे आले असून, त्यांच्या अनुभवाचा सभागृहाला निश्चितच लाभ होईल.

उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले, हे शासन सर्वसामान्यांना न्याय देणारे आहे. सर्वसामान्यांना न्याय देणाऱ्या या सभागृहात सामान्य कार्यकर्त्याची उपाध्यक्षपदी निवड झाली याचा मला मनस्वी आनंद झाला आहे. उपाध्यक्ष पदावरून अण्णा बनसोडे सभागृहातील



सदस्याच्या प्रश्नातून राज्यातील जनतेला न्याय देतील, असा विश्वासही त्यांनी यावेळी व्यक्त केला.उपमुख्यमंत्री शिंदे अभिनंदनपर भाषणात म्हणाले, विधानसभेच्या उपाध्यक्ष पदी सदस्य अण्णा बनसोडे यांच्या निवड प्रक्रियेत सर्वपक्षीय सहकार्याचे वातावरण दिसून आले. विरोधी पक्षातील नेत्यांनीही सकारात्मक भूमिका घेत श्री.बनसोडे यांच्या निवडीला पाठिंबा दर्शवला, याबद्दल उपमुख्यमंत्री शिंदे यांनी विरोधी पक्षातील नेत्यांचेही आभार मानले आणि उपाध्यक्षपदी विराजमान झालेल्या अण्णा बनसोडे यांच्या भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या.




## भारत आनंदी का नाही?

२० मार्च हा दिवस जागतिक आनंद दिवस म्हणून साजरा केला जातो. या दिवसाचे औचित्य साधून संयुक्त राष्ट्र संघाच्या सस्टनेबल डेव्हलपमेंट सोल्युशन नेटवर्कद्वारे दरवर्षी एक सर्व्हे केला जातो. संपत्ती, आरोग्या बरोबरच परस्परंवरील विश्वास, ऋणानुबंध, करुणा या निकषांच्या आधारावर हे सर्व्हेक्षण केले जाते. वरील निकषांचा विचार करून यावर्षीही या संस्थेने जगातील १४७ देशांचा सर्व्हे करून एक अहवाल प्रसिद्ध केला. या अहवालात या संस्थेने जगातील सर्वाधिक आनंदी देशांची यादी प्रसिद्ध केली. या यादीतील पहिल्या वीस देशांमध्ये युरोपातील देशांचे वर्चस्व आहे. गेल्या अनेक वर्षापासून युद्धाच्या आगीत होरपळणारा इस्राईल हा देश आनंदी देशांच्या यादीत आठव्या स्थानी आहे. सतत युद्धाच्या छायेत राहूनही इस्रायली नागरिक आनंदी आहेत. या अहवालानुसार जगातील सर्वात आनंदी देश म्हणून फिनलँड या देशाची निवड करण्यात आली. विशेष म्हणजे फिनलँड हा देश सलग आठव्यांदा जगातील सर्वात आनंदी देश ठरला आहे. भारत मात्र या देशांच्या यादीत खूप खालच्या क्रमांकावर आहे. १४७ देशांच्या यादीत भारत ११८ व्या क्रमांकावर आहे. विशेष म्हणजे पाकिस्तान, नेपाळ, आणि चीन हे भारताच्या शेजारी देश भारतापेक्षा अधिक आनंदी आहेत असा हा अहवाल सांगतो. पाकिस्तान, नेपाळ आणि चीन यासारख्या देशात सध्या मोठया प्रमाणात अराजकता माजली असताना देखील ते देश आनंदी आहेत इतकेच काय तर युद्धग्रस्त युक्रेन आणि पॅलेस्टाईन हे देशही भारतापेक्षा अधिक आनंदी आहेत. आनंदी देशांच्या यादीत युक्रेन १११ व्या क्रमांकावर आहे तर पॅलेस्टाईन १०८ व्या क्रमांकावर आहे. जगातील गरीब, मागास आणि युद्धाच्या छायेत असणाऱ्या देशातील लोक आनंदी असताना भारतासारख्या खंडप्राय देशातील लोक आनंदाबाबतीत तळाच्या स्थानी असणे ही चिंतेचीच बाब आहे. भारतातील नागरिक आनंदी का राहू शकत नाहीत, याचा गांभीर्याने विचार करण्याची वेळ आली आहे. फिनलँडने सलग आठव्यांदा आनंदी देशाच्या यादीत अव्वल क्रमांक मिळवला याला कारणही तसेच आहे. येथे अनेक गोष्टी निर्विवादपणे चांगल्या आहेत. सुंदर निसर्ग, विस्तीर्ण जंगले आणि तलावाचा देश. हा देश सर्वव्यापी सार्वजनिक सेवांसाठी देखील ओळखला जातो. आम्ही सुस्थितीत आहोत, देशाच्या बऱ्याच गोष्टी व्यवस्थित आहेत असा तेथील लोकांना विश्वास आहे. अधिकारावरील व्यापक विश्वास, गुन्हेगारीचा निम्नस्तर आणि सम नता असे मत तेथील लोकांनी व्यक्त केले. आनंदाच्या अहवालातील एक महत्वाचे मोजमाप म्हणजे लोकांना किती सुरक्षित वाटते. फिनलँडने काही वर्षांपूर्वी आपल्या शिक्षण प्रणालीत आमूलाग्र बदल केला आहे. फिनलँड मधील शिक्षण प्रणाली ही जगातील सर्वोत्तम शिक्षण प्रणाली मानली जाते. फिनलँड देशात बेरोजगारीचा दर सर्वात कमी आहे. शिवाय तेथील आरोग्य प्रणाली देखील सर्वोत्तम आहे. त्यामुळे तेथील लोक सर्वाधिक आनंदी आहेत. फिनलँड देशाला इतर देशांपेक्षा वेगळे बनवणारा आणखी एक घटक म्हणजे सम नता. जी प्रत्येकासाठी संधी निर्माण करते. मग ते कोणत्याही सामाजिक, आर्थिक पार्श्वभूमीचे असले तरीही. फिनलँडमध्ये मध्यमवर्ग जास्त आहे आणि गरिबी कमी आहे. भारतातही फिनलँड सारखी व्यवस्था निर्माण झाली तर भारतीय लोकही आनंदी राहतील. मात्र येथील व्यवस्था बदलण्याची इच्छाशक्ती कोणाकडे नाही म्हणूनच भारत आनंदी देशाच्या यादीत तळाच्या स्थानी आहे.

# 'हलाल प्रमाणपत्रा'वर महाराष्ट्रात बंदी घालावी !

हलाल प्रमाणपत्राचा विषय मागील दोन-तीन वर्षांपासून मोठ्या प्रमाणात गाजतो आहे. जागतिक पातळीवर अनधिकृतपणे समांतर अर्थव्यवस्था उभारणाऱ्या हलाल प्रमाणपत्राने भारतातही आपले हातपाय घट्ट रोवले आहेत. या प्रमाणपत्राचे धोके ओळखून उत्तर प्रदेशमध्ये योगी सरकारने हलाल प्रमाणपत्रावर बंदी आणली आहे. अशाच प्रकारे महाराष्ट्रातही हलाल प्रमाणपत्राच्या नोंदीवर आणि हलाल प्रमाणित उत्पादनांवर बंदी आणावी यासाठी हिंदू जनजागृती समितीच्या शिष्टमंडळाने राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेतल्याचे वृत्त वाचनात आले. समितीच्या मागणीची दाखल घेत उपमुख्यमंत्र्यांनी राज्याचे अन्न व नागरी पुरवठा सचिव यांना प्रस्ताव सादर करण्याचे आदेश दिले आहेत

जागतिक पातळीवर काही मुस्लिम संघटना अनधिकृतपणे हलाल सर्टिफिकेशनची योजना राबवत आहेत. त्यांच्या शाखा आज भारतभर निर्माण झाल्या आहेत. एखाद्या कंपनीला आपले उत्पादन आखाती देशांत किंवा मुस्लिबहुल भागात विकायचे असेल, तर अशा कंपन्यांना हलाल सर्टिफिकेशन करणे या संघटनांकडून अनिवार्य कारण्यात आले आहे. या संघटना व्यापारी कंपन्यांकडून लक्षावधी रुपये घेऊन त्यांना हलाल प्रमाणपत्र देतात. या प्रमाणपत्रासोबत उत्पादनावर छापण्यासाठी लोगो देण्यात येतो. मुस्लिमबहुल भागात तेथील नागरिक हा लोगो पाहूनच उत्पादने खरेदी करतात, असे यांच्याकडून सांगण्यात येते. एकदा हलाल प्रमाणपत्र




घेतल्यावर दरवर्षी ने नूतनीकरण करण्यासाठी पुन्हा हजारो रुपये या संघटनांकडून वसूल केले जातात. या सर्व प्रक्रियेत त्या देशातील सरकारला कोणताही लाभ होत नाही. सरकार दरबारी या सर्व व्यापाराची कोणतीही अधिकृत नोंद नसते. या योजनेतून गोळा करण्यात आलेल्या पैशातून आज हलाल इकॉनॉमी जागतिक पातळीवरील एक बलाढ्य इकॉनॉमी झाली आहे. या योजनेतून मिळणारा पैसा जगभरात पकडल्या गेलेल्या दहशतवाद्यांना न्यायालयीन साहाय्य पुरवण्यासाठी वापरला जातो हे आता सप्रमाण सिद्ध झाले आहे. यासंदर्भातील अनेक व्हिडीओज आणि लेख गूगलवर उपलब्ध आहेत. भविष्यातील धोका ओळखून उत्तर प्रदेश सरकारने राज्यात विखुरलेल्या या संघटनांची पाळेमुळे खणून काढायला सुरुवात केली आणि राज्यात हलाल सर्टिफिकेशन करण्यावर बंदी घातली आहे. उत्तर प्रदेश राज्यात भाजपचे सरकार आहे. तोच भाजप पक्ष आज महाराष्ट्र राज्याच्या सरकारमधील प्रमुख पक्ष आहे.

त्यामुळे उत्तर प्रदेश सरकारप्रमाणे महाराष्ट्रातही हलाल उत्पादनांवर आणि सर्टिफिकेशनवर बंदी घालण्याची मागणी होऊ लागली आहे. जागतिक अर्थव्यवस्थेला आव्हान देणाऱ्या हलाल इकोनॉम ीच्या अनधिकृत सर्टिफिकेशनवर आता अनेक राष्ट्र बंदी घालण्याच्या तयारीत असून काही राष्ट्रांनी याबाबत कडक धोरण आखले आहे. खाद्यपदार्थांच्या संदर्भात कायद्यानुसार 'भारतीय खाद्य सुरक्षा आणि मानक प्राधिकरण' (एफएसएसएआय) या शासकीय संस्थेला खाद्यपदार्थांचे मानके ठरवण्याचा व प्रम ाणपत्र देण्याचा अधिकार देण्यात आला आहे; मात्र 'हलाल प्रमाणन' ही एक समांतर प्रणाली उभी करण्यात आली आहे, जी खाद्य पदार्थांच्या गुणवत्तेबाबत भ्रम निर्माण करून सरकारी नियम ांचे उल्लंघन करते. महाराष्ट्रासह देशभरात 'हलाल इंडिया', 'हलाल सर्टिफिकेशन सर्व्हिसेस इंडिया', 'जमियत उलेमा-ए-हिंद', 'जमियत उलेमा-ए-म हाराष्ट्र' आदी अनेक संस्थांकडून बेकायदेशीपणे हलाल प्रमाणपत्रांचे वाटप करून कोट्यवधी रुपये गोळा करण्यात येत आहेत.

स्वत: केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामण यांनीही खाजगी संस्थांना प्रमाणपत्र वाटप करून पैसे गोळा करण्याचा अधिकार नाही, असे स्पष्ट केले आहे. हलाल इकोनॉमीला सहकार्य म्हणजे आतंकवादाला समर्थन हे समीकरण लक्षात घेऊन हलाल प्रमाणपत्र घेणाऱ्या कंपन्यांवर, उपहारगृहांवर आणि वस्तूंवर नागरिकांनी बहिष्कार घालायला हवा ! वस्तू विकत घेताना त्यावर हलाल चिन्ह आहे का पडताळावे, हॉटेल, रेस्टरंटमध्ये जाताना बोर्डावर, मेन्यूकार्डावर हलालचे चिन्ह आहे का तपासावे. राज्य सरकार हलाल सर्टिफिकेशनवर बंदी आणेल तेव्हा आणेल, तोपर्यंत नागरिकांनी हलाल प्रमाणित उत्पादनांवर बहिष्कार घालून या अर्थव्यवस्थेचे कंबरडे मोडण्यास हातभार लावायला हवा !

**जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**
**संपर्क : ९६६४५५९७८०**

# आदर्श शिक्षक महापौर पुरस्कार सन २०२३-२४ दत्तात्रय रासकर यांना प्रधान

**अक्षराज : राजकुमार इकडे**

**दि.२७, सुपा (अहिल्यानगर) :** पारनेर तालूक्याच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तूरा, वाघुंडे गावचे सुपूत्र व वाघुंडे गावचे मा. सरपंच पोपट(राजेंद्र) रासकर व सुभाष रासकर यांचे बंधू श्री. दत्तात्रय अर्जुन रासकर (रा-नवी मुंबई) यांना आदर्श शिक्षक महापौर पुरस्कार देण्यात आला.

पूरस्कार वितरण करतेवेळी बृहन्मुंबई म हानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त डॉ. अमित सैनी, शिक्षण उपायुक्त प्राची जांभेकर, प्राथमि क शिक्षणाधिकारी राजेश कंकाळ माध्यमिक शिक्षणाधिकारी सूजाता खरे, आदर्श प्रशासकीय अधिकारी किसन बाजीराव पावडे यांच्या हस्ते




प्रदान करण्यात आला १५ वर्षापासून ट्रॉम्बे कोळीवाडा म.न.पा. मराठी माध्यमिक शाळा येथे कार्यरत असून त्यांची विशेष उल्लेखनीय कामगिरी म्हणजे शाळेतील विद्यार्थ्यांसाठी अहोरात्त मेहनत, कोविडच्या काळात विदयार्थ्यांचे नुकसान होऊ नये म्हणून online अध्यापन प्रश्नपत्तिका निर्मिती, १००% निकालासाठी विशेष साप्ताहिक परिक्षांचे आयोजन त्याच बरोबर S.S.C. बोर्ड भूगोल विषयांचे परिक्षक म्हणून ०८ वर्षापासून कार्यरत, शाळेतील खेळाडूंना राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावर सहभागी होण्यासाठी प्रोत्साहन, त्याचबरोबर म ेहनत, सातत्य, ध्येय, शिस्तप्रियता, समसूचकता, विद्यार्थ्यांसाठी तळमळ या सगळ्या गुणांमूळेच त्यांना हा पुरस्कार मिळाला आहे. या क्षणी बोलताना हा पुरस्कार माझा एकट्याचा नसून, माझ्या विद्यार्थ्यांचा माझ्या शाळेचा अभिमान आहे. आजपर्यंत प्रामाणिकपणे काम केल्याची पोचपावती. अशा शब्दांत दत्तात्रय रासकर यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

### स्टँडअप...

स्टँडअप कॉमेडीत
रे हेतू लपलेले छुपे
विनोदवीर म्हणता
आंत राक्षसीणलपे

कार्यक्रम करे हीट
सपसप नोटा छापे
बुध्दी जप्तझालेली
मागेचं पडले छापे

झोप उडवून इतरां
आपण शांत झोपे
कमरेखाली विनोद
वाट्टेलं तितके झापे

विडंबनातूनि उघडे
विनोदवीरांची रूपे
तुळशी सोबत लावे
विषारीभांगेची रोपे

हिडीसशब्दांचीराळ
डोई मिरवे शिरटोपे
मेणा उचलायला ते
यार असतात भोपे

कुणीकधी अडवता
किती विक्राळ कोपे
व्यक्तीस्वातंत्र्यां गदा
अक्राळ करती सोपे

तुम्ही कुणांचे काढा
कशीहीकधीही मापे
अश्लील टिका करी
ती माफ हजारो पापे

**- हेमंत मुसरीफ, पुणे**
**९७३०३०६९९६**

# प्रदूषणाचा भस्मासुर !

स्विस संस्था आयक्युएअरने जागतिक प्रदूषणावर ११ मार्च २०२५ रोजी एक अहवाल प्रसिद्ध केला. हा अहवाल भारतासाठी धक्कादायक आहे कारण या अहवालानुसार जगातील सर्वाधिक प्रदूषित २० शहरात १३ शहरे भारतातील आहेत. या अहवालात असेही नमूद करण्यात आले आहे की भारत जगातील पाचव्या क्रमांकाचा प्रदूषित देश असून आसाम राज्यातील आसाम आणि मेघालयाच्या सीमेवर असणाऱ्या बर्णीहाट हे शहर जगातील सर्वाधिक प्रदूषित शहर ठरले आहे. तर जगातील १३८ देशांच्या राजधानीच्या शहरांपैकी दिल्ली हे सर्वात प्रदूषित राजधानीचे शहर असल्याची नोंद या अहवालात करण्यात आली आहे. या अहवालाच्या निर्मितीसाठी वातावरणातील प्रदूषणकारी घटक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पीएम - २.५ कणांचे प्रमाण बारकाईने तपासण्यात आले होते. जगातील १३८ देशांमध्ये बसविण्यात आलेल्या ३० हजार ग्राउंड मॉनिटरच्या माध्यम ातून ८९५४ शहरांची माहिती संकलित करण्यात आली. या अहवालातील निष्कर्ष पाहिल्यानंतर भारतातील प्रदूषणाची समस्या किती गंभीर आहे हे लक्षात येईल. विशेष म्हणजे जगातील सर्वाधिक प्रदूषित शहरांच्या यादीत भारतातील दिल्ली, पंजाबमधील मुलतानपूर, हरियाणामधील लोणी, नवी दिल्ली, गुरुग्राम, गंगानगर, ग्रेटर नोएडा, भिवडी, ( राजस्थान - हरियाणा सीम ेवरील राजस्थानच्या अल्वर तालुक्यातील शहर ) मुझफरनगर, हनुमानगड, नोएडा या शहरांचा समावेश आहे. या शहरात वातावरणातील प्रदूषणकारी घटक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पीएम - २.५ कणांचे प्रमाण ५३.३ मायक्रोग्राम क्यूबिक मीटर या पातळीवर आले असून ते आरोग्य संघटनेने निर्धारित केलेल्या सुरक्षेच्या पातळीपेक्षा दहापटीने अधिक असल्याचे दिसून आले. स्विस संस्थेचा हा अहवाल देशातील नागरिकांची झोप उडवणारा आहे, कारण आज



देशातील सर्वच महत्वाची शहरे प्रदूषणाने गुदम रत आहेत. त्या शहरात राहणाऱ्या नागरिकांचे जीवन प्रदूषणामुळे धोक्यात आले आहे. एकीकडे २१ व्या शतकातील सुखासीन जीवनाचे मनोहरी चित्र उभे केले जात आहे. स्मार्ट सिटीचे स्वप्न दाखवले जात आहे तर दुसरीकडे याच शहरांची फुफ्फुसे प्रदूषणाने निकामी होत आहेत. प्रदूषणामुळे या शहरातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. प्रदूषणामुळे या शहरातील नागरिकांना फुफ्फुसाचे, हृदयाचे, रक्ताभिसरणाचे आजार मोठ्या प्रमाणावर होत आहेत. न्यूमोनिया, पक्षघात, हृदयविकार, फुफ्फ ुसाचा कर्करोग यासारखे मोठे आजार प्रदूषित हवेमुळेच होत आहेत. प्रदूषणामुळे दिल्लीसारख्या देशाच्या राजधानीची काय अवस्था झाली हे आपण पाहत आहोतच. प्रदूषणामुळे दिल्लीतील शाळा कॉलेजसना सुट्टी देण्याची वेळ प्रशासनावर येते. प्रदूषणामुळे दिल्लीत खेळला जाणारा रणजी सामना रद्द करावा लागला होता. चार वर्षांपूर्वी दिल्लीत इंग्लंड आणि भारत यांच्यात झालेल्या कसोटी सामन्यात खेळाडू चक्क मास्क लावून मैदानात उतरले होते. नंतर हा सामना देखील प्रदूषणामुळे रद्द करावा होता त्यामुळे भारताची जगात नाचक्की झाली होती. जे दिल्लीत आहे तेच मुंबईत आहे. देशाची आर्थिक राजधानी असलेली मुंबई प्रदूषणाच्या बाबतीत देशाच्या राजधानीची बरोबरी करू लागली आहे. मुंबईचे प्रदूषणही उच्चतम पातळीवर पोहचले आहे. प्रदूषणामुळे लोकांना शुद्ध हवा मिळणे दुरापास्त झाले आहे. शुद्ध हवेसाठी लोकांना पैसे मोजावे लागत आहे. मुंबई - दिल्लीसारख्या मोठ्या लोकसंख्येच्या शहरात ऑक्सिजन बार सुरू करण्यात आले आहेत. एका तासाला २०० ते ५०० रुपये मोजून नागरिक ऑक्सिजन विकत घेत आहेत. इतके होऊनही आपण त्यातून बोध घेत नाही. या मोठ्या शहरात वाहनांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढत आहे. मुंबई, पुणे, नागपूर यासारख्या मोठ्या शहरात लोकसंख्येपेक्षा वाहनांची संख्या अधिक आहे. वाढत्या वाहनांमुळे प्रदूषणात भर पडत आहे. वाहनातून बाहेर पडणाऱ्या धुरात प्रदूषणाचे प्रम ाण खूप असते. धूळ, कारखान्यातून निघणारा धूर, बांधकामातून पसरणारे कण, वृक्षतोड, पृथ्वीचे वाढते तापमान, प्लास्टिकचा भस्मासुर अशा अनेक कारणांमुळे प्रदूषणाचा आलेख उंचावत आहे. स्विस संस्थेने जाहीर केलेला हा अहवाल म्हणजे धोक्याची घंटा आहे. वाढते प्रदूषण कमी करण्यासाठी वेळीच ठोस उपाय करायला हवेत. कारखान्यातून बाहेर पडणाऱ्या धुरातून प्रदूषणकारी घटक कमी करण्यासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करायला हवा. दगड खाणींवर नियंत्रण आणायला हवे. वाहनांची संख्याही कमी करायला हवी. प्रसंगी सम - विषम सारखे कठोर निर्णय घ्यायला हवेत. युरोपीय देशात प्रदूषण कमी करण्यासाठी काय उपाययोजना केल्या जातात याचा अभ्यास करायला हवा. नागरिकांनी सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा अधिकाधिक वापर केला पाहिजे. याशिवाय कचऱ्याचे योग्य वर्गीकरण आणि विल्हेवाट तसेच सौरऊर्जेच्या वापरावर भर द्यायला हवा. वृक्षारोपण करुन ते वृक्ष जगवले पाहिजेत. शासन, प्रशासन आणि नागरिकांच्या एकत्रित प्रयत्नांतूनच प्रदूषणाचा हा भस्मासुर रोखता येईल.

**- श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## समता गृहनिर्माण सोसायटीचे जिल्हाधिकार्यांना निवेदन



**अक्षराज : संगीता वनकळस**

**दि.२६, धाराशिव :** छत्रपती संभाजी महाराज चौक ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक मार्गाची सुधारणा व विसर्जन विहिर ते एचडीएफसी बँकेपर्यंतचा उर्वरीत कॉंक्रीट रस्ता तत्काळ तयार करण्यात यावा. अशी मागणी समता गृहनिर्माण सोसायटीच्या वतीने जिल्हाधिकार्यांकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आली आहे. मागणीची दखल न घेतल्यास दिनांक ०१ एप्रिल २०२५ पासून विसर्जन विहिरीजवळ आमरण उपोषण करण्याचा इशारा ही समता गृहनिर्माण सोसायटीचे चेअरमन नाना घाटगे यांनी दिला आहे.

निवेदनात म्हटले आहे की, संदर्भीय दोन्ही कामे तात्काळ सुरू करणेबाबत विनंती केलेली आहे. मात्र अद्यापपर्यंत सदरची कामे चालु झालेली नाही. दोन्ही कामांना प्रशासकीय मान्यता मिळालेली असून प्रत्यक्षात दोन्ही ठेकेदारांना कामाचे कार्यारंभ आदेश देण्यात आलेले आहेत. मात्र दोन्ही कामे अर्धवट केलेली आहेत. त्यामुळे समता नगरवासीयांना खड्ड्यामुळे व धुळीमुळे श्वसनाचा त्रास होवून भयंकर आजाराला समोरे जावे लागत आहे. दोन्ही रस्ते रहदारीचे असल्याने हजारो वाहने ये-जा करत असतात. त्यामुळे सर्वत्र धुळीचे साम्राज्य झाल्याने नागरीकांचे आरोग्य धोक्यात आलेले आहे. तरी संबंधीत ठेकेदारास सदरचे काम तात्काळ सुरू करण्याचे आदेश देऊन काम पूर्ण करून घ्यावे अन्यथा समता नगरवासीयांच्या वतीने संतोष (नाना) दत्तात्रय घाटगे स्वतः रखडलेल्या रस्त्यावर विसर्जन विहिरीजवळ ०१ एप्रिल पासून आमरण उपोषण करणार आहे. त्यानंतर होणार्या परिणामास व माझ्या जीवितांची सर्वस्वी जबाबदारी प्रशासनाची राहील याची नोंद घ्यावी, असेही निवेदनात घाटगे यांनी नमूद केले आहे. यावेळी समता सहकारी गृहनिर्माण संस्थेचे अध्यक्ष नानासाहेब घाटगे, सचिव पंकज पडवळ, संचालक वासुदेव वेदपाठक, महेश काटे, प्रशांत वाघ, भीमराव चव्हाण, वसंत पोतदार, उमाकांत आघोर, रामेश्वर टेकाळे, दिलीप मस्के, राजेश बोपलकर, धनंजय बोरावके, धनंजय राठोड, लोमटे व इतर पदाधिकारी उपस्थित होते.

## बॅटरी वॅट क्षमतेमध्ये बदल केलेल्या ईव्ही बाईक्सवर कारवाई- परिवहन मंत्री

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२६, मुंबई :** मुंबईमध्ये बॅटरी वॅट क्षमतेमध्ये बदल करून ईव्ही बाईक रस्त्यावर चालवल्या जात असल्याचे निदर्शनास आले आहे. अशा ईव्ही बाईक्सवर कारवाई करण्यात येत असल्याची माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी विधानपरिषदेत दिली. सदस्य प्रसाद लाड यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाला उत्तर देताना मंत्री सरनाईक बोलत होते. आतापर्यंत बॅटरी क्षमतेमध्ये बदल केल्याप्रकरणी २११ गुन्हे नोंदवण्यात आल्याचे सांगून परिवहन मंत्री सरनाईक म्हणाले की, अशा प्रकारे बदल केलेल्या ८८९ ईव्ही बाईक जप्त करण्यात आल्या आहेत. काही कंपन्यांकडून क्षमता वाढवून ईव्ही बाईक्स रस्त्यावर फिरवल्या जात आहेत. या चीनी बनावटीच्या बाईक्स सोसायटीमध्ये अंतर्गत वापरासाठी ही आणल्या जात आहेत. अशा सर्वच ईव्ही बाईक्सची नोंदणी ही अत्यावश्यक करण्याचे धोरण राबवण्यात येईल अशी माहिती परिवहन मंत्री सरनाईक यांनी दिली.

## एमपीएससी परीक्षेतील डिस्क्रिप्टिव्ह पद्धत लागूच राहणार - मुख्यमंत्री

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२६, मुंबई :** महाराष्ट्र लोकसेवा आयोग (MPSC) परीक्षेत डिस्क्रिप्टिव्ह स्वरूप लागू करण्याचा निर्णय कायम राहणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानपरिषदेत स्पष्ट केले. २०२२ मध्ये हा निर्णय घेण्यात आला होता. परंतु विद्यार्थ्यांच्या मागणीनंतर २०२५ पासून तो लागू करण्याचे ठरवण्यात आले. आता तो मागे घेण्याचा कोणताही प्रश्न नसल्याचे ही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले. सदस्य प्रवीण दरेकर यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाला उत्तर देताना मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. यावेळी सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड.आशिष शेलार यांनी ही प्रश्नाला उत्तर दिले. विरोधी पक्ष नेते अंबादास दानवे, सदस्य शशिकांत शिंदे, सदाभाऊ खोत, एकनाथ खडसे, प्रसाद लाड यांनीही चर्चेमध्ये सहभाग घेतला.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले की, एमपीएससी परीक्षा यूपीएससी प्रमाणे डिस्क्रिप्टिव्ह स्वरूपात घेतली जाणार आहे. काही कोचिंग क्लासेसच्या लोकांनी विद्यार्थ्यांना गोंधळात टाकण्याचा प्रयत्न केला असला तरी मुलांच्या भविष्यासाठी हा बदल गरजेचा आहे. सुरुवातीला २०२३ मध्ये हा बदल होणार होता, पण विद्यार्थ्यांच्या मागणीनंतर तो २०२५ पासून लागू करण्याचा निर्णय झाला आहे. डिस्क्रिप्टिव्ह पद्धतीमुळे विद्यार्थी यूपीएससीसाठी अधिक सक्षम होतील,असेही मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले. सांस्कृतिक कार्य मंत्री शेलार म्हणाले की, महाराष्ट्र अराजपत्रित गट ब आणि गट क सेवा संयुक्त पूर्व परीक्षेसाठी वयोमर्यादा वाढवण्याच्या मागणीचा सकारात्मक विचार करण्यात आला आहे. संबंधित विभागाच्या मागणीपत्रानुसार आणि नियमानुसार पीएसआय परीक्षांसाठी एका वर्षाची वयोमर्यादा वाढवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. आयोग स्वायत्त असला तरी, विविध न्यायालयीन निर्णय, विधी व न्याय विभागाचे मत आणि सरकारच्या धोरणाच्या आधारे हा निर्णय घेण्यात आला आहे. यासोबतच, गट क परीक्षांमध्ये देखील PSI, सेल्स टॅक्स इन्स्पेक्टर आणि ASO परीक्षांसाठी एक वर्ष वयोमर्यादा वाढवण्याचा निर्णय लागू करण्यात आला आहे.

## विदर्भाच्या रणजी संघाचे मुख्यमंत्र्यांकडून अभिनंदन

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२६, मुंबई :** रणजी ट्रॉफी ही देशातील सर्वात प्रतिष्ठेची आणि मोठी क्रिकेट स्पर्धा मानली जाते. महाराष्ट्र हे एकमेव राज्य आहे. जिथे मुंबई, विदर्भ आणि उर्वरित महाराष्ट्र अशा तीन वेगवेगळ्या संघांचा समावेश असून यंदाच्या रणजी ट्रॉफी स्पर्धेत विदर्भाने शानदार कामगिरी करत जेतेपद पटकावले आहे.

या ऐतिहासिक विजयाबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विदर्भ संघाचे विधानपरिषदेत मनःपूर्वक अभिनंदन केले. मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, क्रिकेट विश्वचषक जिंकणारा आपला संघ असो, किंवा देशासाठी पदके जिंकणारे खेळाडू असोत त्यांचा उचित सन्मान करणे हे सरकारचे कर्तव्य आहे. खेळाडूंना योग्य सन्मान व पुरस्कार देण्याचे काम राज्य शासन करेल. राज्य शासनाकडून खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी अधिकाधिक सहकार्य केले जाईल, असेही मुख्यमंत्र्यांनी या निवेदनाद्वारे स्पष्ट केले.

## एस.टी महामंडळाच्या सर्व बसेस टप्प्याटप्प्याने अपारंपरीक इंधनावर परावर्तीत करणार - मुख्यमंत्री



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२६, मुंबई :** एस.टी महामंडळाच्या सर्व बसेस टप्प्याटप्प्याने अपारंपरीक इंधनावर परावर्तित करण्यात येणार आहेत. एसटीच्या बसेस इलेक्ट्रिक आणि एलएनजी इंधनावर सुरू करण्याचे नियोजन असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बुधवार, दिनांक २६ मार्च २०२५ रोजी विधानपरिषदेत दिली.

सदस्य उमा खापरे यांनी पिंपरी-चिंचवड आणि हिंजवडी परिसरातील प्रदूषणाबाबत उपस्थित केलेल्या प्रश्नावर उत्तर देताना मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. यावेळी चर्चेमध्ये शशिकांत शिंदे, प्रविण दरेकर, अनिल परब, अमित गोरखे, मनीषा कायंदे यांनी सहभाग घेतला.

एसटी महामंडळाकरिता ५ हजार १५० इलेक्ट्रिक बसेसची खरेदी करण्यात येणार असल्याचे सांगून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, यापैकी ४५० बसेस खरेदी केल्या आहेत. तसेच एसटीच्या सध्याच्या बसेस एलएनजीम ध्ये परावर्तित करण्यात येणार असून एलएनजी पुरवठा करण्यासाठी करार करण्यात आला आहे. राज्यात ईव्हीच्या वापराला प्रोत्साहन देण्यात येत आहे. त्याचाच एक भाग म्हणून ईव्ही धोरण आणले आहे. राज्यात मोठ्या प्रम णावर चार्जिंग स्टेशन उभारण्यात येत आहेत. यंदाच्या अर्थसंकल्पामध्ये ३० लाखापेक्षा जास्त किमतीच्या ईव्ही वाहनांवर ६ टक्के कर आकारण्याचे जाहीर केले आहे. परंतु हा कर मागे घेण्याची घोषणा सभागृहात करण्यात येणार आहे.

राज्यातील रस्त्यावर धावणाऱ्या वाहनांपैकी किमान ८० टक्के ईव्ही वाहने होतील यादृष्टीने प्रयत्न सुरू आहे. ईव्ही वाहनांचा वापर वाढला की प्रदूषण कमी होण्यास मोठ्या प्रमाणावर मदत होईल. तसेच हिंजवडी परिसरातील होणारे प्रदूषण हे मुख्यतः वाहनांमुळे होत असून यासाठी मेट्रो आणि बसेसची कनेक्टिव्हीटी सुरू करण्यात येत आहे. जास्तीत जास्त ईव्ही बसेस घेण्याचा प्रयत्न असून सार्वजनिक वाहतूक व्यवस्था ही प्रदूषण मुक्त असावी असे शासनाचे धोरण असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सभागृहात सांगितले.

सर्व शासकीय वाहनेही इलेक्ट्रिक करण्याचे शासनाचे धोरण असल्याचे सांगून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, आमदारांनाही देण्यात येणाऱ्या वाहन कर्जावरील व्याज सवलतीही ईव्हीसाठीच देण्यात येतील.

सर्व मंत्री यांची वाहनेही ईव्हीम ध्ये बदलण्याचे शासनाचे नियोजन असल्याचे ही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

मंत्री चंद्रकांतदादा पाटील म्हणाले की, रेडीमिक्स प्लांटना पूर्ण अच्छादन करण्याचा नियम शासनाने केला आहे. हिंजवडी परीसरात असलेल्या या रेडीमिक्स प्लांटलाही हा नियम लागू आहे. अशा प्रकारे पूर्ण अच्छादन न करणारे प्रकल्प बंद करण्याची कार्यवाही करण्यात येईल. पिंपरी चिंचवड महानगर पालिकेला प्रदूषण नियंत्रणासाठी केंद्र शासनाकडून प्राप्त झालेल्या १७२ कोटी रुपयांच्या निधीच्या विनियोगाबाबतही चौकशी करण्यात येईल, अशी माहिती मंत्री पाटील यांनी दिली.

## कर्मचारी संपावर, नागपुरात शहर बस सेवा ठप्प



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२६, नागपूर :** शहरात धावणाऱ्या महापालिकेच्या 'आपली बस'च्या चालकांनी वाढीव वेतनाच्या थकबाकीसाठी बुधवारी संप पुकारल्याने शहर बससेवा ठप्प झाली. त्यामुळे सर्वसामान्य नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागला.

ऑटोरिक्षा चालकांची मनमानी भाडे आकारून प्रवाशांची लूट केली. नागपूरमधील आपली बस कंत्राटी कर्मचारी बुधवार, दिनांक २६ मार्च २०२५ रोजी सकाळी संपावर गेले. त्यामुळे शहरातील एकाही मार्गावर सिटी बस धावली नाही. महाराष्ट्र सरकारने किमान वेतनात सुधारणा केली आहे. त्यानुसार चालक, वाहकांना वेतन देणे अपेक्षित आहे. परंतु वाढीव वेतनाची थकबाकी गेल्या साडेचार महिन्यांपासून देण्यात आली नव्हती. चालक, वाहक संघटांनी महापालिकेला दिनांक २५ मार्च २०२५ रोजी संपाचा इशारा दिला होता. परंतु प्रशासनाने ते गांभीर्याने घेतले नाही. त्यामुळे आज चालक, वाहक संपावर केले. शहरात एकाही मार्गावर शहर बस दिसली नाही. त्यामुळे शाळकरी मुले, चाकरमान्यांना ऑटोरिक्षा शाळा, कार्यालय गाठावे लागले आणि घरी परतावे लागले. काहींनी मेट्रोने प्रवास केला.

राज्याच्या उद्योग, कामगार आणि खाण विभागाने चालक आणि वाहकांसाठी किमान वेतनात सुधारणा करण्याची अधिसूचना प्रसिद्ध केली होती. त्याची अंमलबजावणी गेल्या ऑक्टोबरमध्ये आंदोलन करण्यात आले होते. त्यानंतर वाढीव वेतन देण्याची मागणी मान्य करण्यात आली. प्रत्यक्षात वाढीव वेतन देण्यात आले नाही. गेल्या साडेचार महिन्यांपासून वाढीव वेतनाची थकबाकी होती. त्यासाठी चालक, वाहकांच्या संघटनांनी संपाचा इशारा दिला होता.


शासकीय निर्णयानुसार राज्यभरातील कर्मचाऱ्यांना वर्ग अ आणि वर्ग ब महापालिकांमध्ये विभागले गेले आहे. वर्ग अ

महानगरपालिकेअंतर्गत येणाऱ्या चालकांना १९ हजार ६२५ पगार मिळेल, तर वर्ग ब अंतर्गत येणाऱ्या चालकांना १८ हजार ९७५ पगार मि ळेल, असे नमूद करण्यात आले आहे. प्रशासन आणि बस सेवा देत असलेले कंत्राटदार (ऑपरेटर) यापैकी कोणी थकबाकी द्यावी, असा पेच होता. त्यासाठी वरिष्ठ अधिवक्ता सुनील म नोहर यांचा अभिप्राय मागवण्यात आला होता. ऑपरेटर आधी महापालिकेने थकबाकी देईल आणि त्यानंतर म हापालिका वाहक, चालकांना ती देईल असे ठरले आहे. २०१५ च्या जीआरनुसार, किमान वेतन १५ हजार रुपये निश्चित करण्यात आले होते.

५ वर्षांनंतर जीआरमध्ये बदल केल्यानंतर, २०२० च्या जीआरमध्ये किमान वेतन (मूलभूत) १८ हजार रुपये करण्यात आले. या नवीन चौकटीनुसार, चालकांना सुमारे २२ हजार रुपये आणि कंडक्टरना सुमारे २० हजार रुपये मिळायला हवे होते, परंतु प्रत्यक्षात, चालक आणि कंडक्टरना फक्त १२ हजार ते १४ हजार रुपये मिळत होते. नवीन जीआरमध्ये, मूळ वेतनात १ हजार रुपयांची ही वाढ झालेली नाही.

## महापालिकेच्यावतीने जागतिक क्षयरोग दिन साजरा

### सामाजिक जबाबदारीच्या माध्यमातून महापालिकेस सहकार्य केलेल्या संस्थाचा महापालिकेकडून सन्मान



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२६, पनवेल :** औद्योगिक वसाहतींना आवश्यक असणाऱ्या विविध योजना महापालिका देण्याचा प्रयत्न करत आहे. येत्या काळात आंतराष्ट्रीय विमानतळ, इतर उद्योग व्यवसायाच्या दृष्टीने लागणारे कौशल्ययुक्त मनुष्यबळ देण्यासाठी महापालिका विविध प्रशिक्षणे देत आहे. तसेच सामाजिक बांधिलकीच्या म ाध्यमातून कंपन्यांनी महापालिकेस सहकार्य करावे असे आवाहन आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांनी केले. जागतिक स्तरावर दरवर्षी २४ मार्च हा दिवस क्षयरोगाविषयी जनजागृती करण्यासाठी 'जागतिक क्षयरोग दिन' म्हणून साजरा करण्यात येतो. या दिनाचे औचित्य साधून सामाजिक जबाबदारीच्या माध्यमातून महापालिकेस सहकार्य केलेल्या स्थानिक कंपन्यांचा, संस्थाचा पालिका मुख्यालयात बुधवार, दिनांक २६ मार्च रोजी सन्मानकरण्यात आला यावेळी ते बोलत होते.

यावेळी उपायुक्त डॉ.वैभव विधाते, पनवेल म हानगरपालिका मुख्य वैद्यकिय अधिकारी डॉ. आनंद गोसावी, सहाय्यक आयुक्त डॉ.रूपाली माने, शहर क्षयरोग अधिकारी डॉ.उषा राठोड, विविध संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते. पंतप्रधान महोदयांनी सन २०२५ ला भारत देश क्षयरोग मुक्त करण्याचे ध्येय ठेवलेले आहे जे की शाश्वत विकास ध्येयाच्या अपेक्षीत कालावधीपेक्षा ५ वर्ष अगोदर आहे. राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रम अंतर्गत १०० दिवसीय क्षयरोग मोहिम पनवेल महानगरपालिका क्षेत्रात दिनांक ०७ डिसेंबर २०२५ पासून राबविण्यास सुरूवात करण्यात आली होती. या मोहीम अंतर्गत पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील अतिजोखमीच्या भागामध्ये जसे कि झोपडपट्टी, वीटभट्टी, कामांसाठी स्थलांतरित झालेले कामगार, बेघर, इतर सामाजिक गट, तसेच तुरुंग, वृद्धाश्रम, आश्रम शाळा , वस्तीगृह, बांधकाम स्थळावरील कामगार, इंडस्ट्रियल वर्कर यांची डिजिटल पोर्टेबल क्ष किरण मशीनद्वारे चाचण्या करण्यात आल्या होत्या.

या मोहिमेंतर्गत महानगरपालिका क्षेत्रातील एकूण लोकसंख्येच्या १५ टक्के प्रमाणे जोखीमग्रस्त नागरिकांची तपासणी करण्यात आली. त्यापैकी ३३ हजार ४५० छातीचे क्ष किरण चाचण्या करण्यात आल्या. त्यातील संशयित ४ हजार ३९० जणांची क्षय रोगाची चाचणी (उइछअअढ) करण्यात आली. या म ोहिमे मध्ये ६०९ नवीन रुग्ण शोधण्यात आले व त्यांना मोफत उपचार चालू करण्यात आले आहेत. तसेच क्षय रुग्णांना निक्षय पोषण योजनेचाही लाभ देण्यात आला आहे. सामाजिक जबाबदारी अंतर्गत महापालिकेस १०० दिवसीय क्षयरोग मोहिमेंतर्गत स्थानिक कंपन्या जसे कि इंडियन टंकसाल मुंबई यांनी ४ डिजिटल हॅन्ड हेल्ड एक्स-रे मशीन सीएसआर फंडातून उपलब्ध करून दिले. तसेच इतर संस्था यामध्ये आयजी पेट्रो केमिकल, दीपक फर्टिलायझर, मिलन फार्मा इंडस्ट्रीज, बर्जर पेंट, हिन्दाल्को, एल ॲण्ड टी, एनएमए प्रोजेक्ट इत्यादींनी १०० दिवसीय क्षयरोग मोहीम यशस्वीरित्या पूर्ण करण्यासाठी योगदान केले. या सर्वांचा यावेळी आयुक्तांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. तसेच म हापालिकेस नेहमी सहकार्य देत असलेल्या एमजीएम वैद्यकिय महाविद्यालय व तेरणा वैद्यकिय महाविद्यालय यांचा देखील यावेळी सन्मान करण्यात आला. याबरोबरच या मोहिमेसाठी सहकार्य केलेल्या पूजा डायग्नोस्टीक कळंबोली व वन एक्सॉर्ट सोल्युशन यांचा देखील यावेळी सत्कार करण्यात आला. सन १८८२ साली रॉबर्ट कॉच शास्त्रज्ञांनी टीबी या जिवाणूचा शोध लावला. त्यानंतर २४ मार्च १९५० साली जागतिक आरोग्य संघटना यांनी मान्यता दिली म्हणून २४ मार्च हा दिवस जागतिक क्षयरोग दिवस म्हणून साजरा करण्यात येतो. क्षयरोग हा लक्षात येण्याजोगा (छजढखब्रबअइडए ुखडएअडए) आजार आहे. तरीही सर्व सरकारी तसेच खाजगी आरोग्यसंस्था, प्रयोगशाळा, औषध भांडार, कंपनी यांनी प्रशासनास रूग्णाबाबत माहिती देणे बंधनकारक असल्याचे निर्देश आयुक्त यांनी केले आहे.

# कॅन्सर तपासणी कक्ष, आरोग्य सुविधांची आयुक्तांकडून पाहणी



**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.२६, नेरूळ (नवी मुंबई) :** नागरिकांना महानगरपालिकेमार्फत उत्तम दर्जाची आरोग्य सेवा पुरविण्याची बांधिलकी जपण्याच्या दृष्टीने महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिलक्ष देत असून से.१५, नेरुळ येथील माँसाहेब मिनाताई ठाकरे रुग्णालयास भेट देत त्यांनी तेथील सुविधांची पाहणी केली. यावेळी त्यांच्यासमवेत वैद्यकिय आरोग्य अधिकारी डॉ.प्रशांत जवादे, सहा.आरोग्य अधिकारी डॉ.धनवंती घाडगे, रुग्णालयाचे वैद्यकीय अधिक्षक डॉ.उद्धव खिल्लारे, कार्यकारी अभियंता उमेश पाटील व इतर अधिकारी उपस्थित होते.केसपेपर नोंदणीसाठी मोठया संख्येने नागरिक प्रतीक्षेत असल्याने त्यांच्याकरिता बैठक व्यवस्थेत वाढ करावी. तसेच केस पेपरसाठी टोकन पद्धत प्रभावीपणे राबवावी असे निर्देश आयुक्तांनी यावेळी दिले.

रुग्णालय इमारतीच्या आवारात एका बाजूला नागरिकांच्या वापरासाठी प्रसाधनगृहाची व्यवस्था करावी. अशा सूचना त्यांनी केल्या. रुग्णालयात पुरविण्यात येणाऱ्या सेवा - सुविधांचे व नागरिकांनी आरोग्यविषयक घ्यावयाची काळजी याविषयीचे माहितीफलक बाहेरील बाजूस मोठया प्रमाणात लावून प्रभावी माहिती प्रसार यंत्रणा राबवावी असेही आयुक्तांमार्फत निर्देशित करण्यात आले.

तळमजल्यावर असलेल्या कॅन्सर तपासणी कक्षांची पाहणी करत, तेथील डॉक्टरांशी संवाद साधत अशा प्रकारची सुविधा महानगरपालिके मार्फत उपलब्ध करुन दिली जात असल्याची माहिती जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहचवा याकरिता व्यापक प्रचार करावा, जेणेकरून महिलांना त्याचा मोठया प्रमाणावर लाभ घेता येईल असे आयुक्तांनी सूचित केले.

त्याचप्रमाणे तेथील फलक प्राधान्याने मराठी भाषेत करण्याच्या सूचनाही देण्यात आल्या. त्या ठिकाणच्या पाचही कॅन्सर तपासणी व उपचार कक्षांची रचना व मांडणी पाहताना बाहेरील बाजूस डिजीटल व फलक अशा दोन्ही प्रकारच्या मांडणीतून ऑडीओ- व्हिडीओ तसेच बॅनर्स व माहिती पुस्तिका, माहिती पत्रके या माध्यमातून माहिती प्रसार अधिक प्रभावी करावा अशा सूचना आयुक्तांनी केल्या. त्यासोबतच कॅन्सर प्रोटोकॉल लक्षात घेऊन त्याची पूर्वलक्षणे काय असतात याविषयी जागरुकता निर्माण करण्यासाठी नागरिकांमध्ये माहिती प्रसारणासाठी विविध माध्यमांचा वापर करावा असे निर्देश आयुक्तांनी दिले.

कॅज्युअल्टी कक्षाची पाहणी करतांना त्याठिकाणी पोर्टेबल सोनोग्राफी मशीन ठेवण्याच्या सूचना आयुक्तांनी केल्या तसेच मॉड्युलर ओटीच्या कामाला वेग देऊन ते लवकरात लवकर वापरात आणण्यासाठी गतीमान कार्यवाही करावी असेही निर्देश देण्यात आले.

केमोथेरपी डे केअर सेंटर, कॅन्सर वॉर्डच्या बाहेरही पूरक माहिती प्रसारण विविध माध्यमांचा वापर करून व्यापक प्रमाणात करावे तसेच डॉक्टर्स व नर्सेस यांना देण्यात येणाऱ्या केमोथेरेपी विषयक प्रशिक्षणाची चाचणी टाटा सेंटरमार्फत घेण्याविषयी कार्यवाही करण्याचे ही आयुक्तांनी निर्देशित केले.मायक्रोबायलॉजी प्रयोग शाळेची पाहणी करतांना विविध तपासण्यांची बारकाईने माहिती घेत आयुक्तांनी याठिकाणी ज्या वैद्यकिय चाचण्या केल्या जातात त्यांची माहिती नवी मुंबई व शेजारच्या शहरातील रुग्णालयांना द्यावी. जेणेकरुन त्यांना आवश्यक असणाऱ्या तपासण्या आपल्या प्रयोगशाळेतून केल्या जाऊ शकतात असेही आयुक्तांनी सूचित केले. सध्या हार्मोन्स बदलांमुळे वंध्यत्वाचे प्रमाण वाढल्याचे दिसून येत असून त्याबाबत महानगरपालिके मार्फत हार्मोनल स्टडी व आयव्हीएफ तंत्रज्ञानाचा वापर करणारी आरोग्य सुविधा निर्माण करण्याबाबत शक्यता तपासून घ्याव्यात व त्याचा अहवाल सादर करावा असेही निर्देश आयुक्तांमार्फत देण्यात आले. आयुष बाह्यरुग्ण सेवा (ओपीडी) कक्ष सुरु करण्याबाबत गतीमान कार्यवाही करावी अशा ही सूचना आयुक्तांनी यावेळी केल्या.


नवी मुंबई महानगरपालिकेमार्फत पुरविण्यात येणाऱ्या आरोग्य सुविधा उत्तम रितीने पुरविण्या सोबतच त्यामध्ये सुधारणा करीत अधिकाधिक गुणवत्तापूर्ण सेवा पुरविण्यावर भर देण्याचे निर्देश महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यावेळी दिले.

# देशात प्रथमच ए.आय प्रणालीचा वापर करून श्वानांची डिजिटल माहिती गोळा

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.२६, पनवेल :** महापालिका हद्दीतील भटक्या श्वानांचे सर्वेक्षण नुकतेच पूर्ण करण्यात आले असून, आर्टिफिशियल इंटेलिजन्सचा वापर करून करण्यात आलेले या डिजिटल सर्वेक्षणाद्वारे मिळालेली माहिती ही भटक्या श्वानांच्या लसीकरणासाठी तसेच निर्बीजीकरणासाठी उपयोगी पडणार आहे. आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली राबविलेल्या हे सर्वेक्षण देशात प्रथमच एआय प्रणालीचा वापर करून पालिका हद्दीतील श्वानांची डिजिटल माहिती गोळा करण्यात आली आहे.

या सर्वेक्षणाचा उपयोग रेबीज मुक्त पनवेलसाठी होणार असल्याचे उपायुक्त डॉ. वैभव विधाते यांनी सांगितले आहे. इंडिकेअर एआय सोल्युशन प्रायव्हेट लिमिटेड या स्टार्ट अप कंपनीच्या माध्यमातून हे डिजिटल सर्वेक्षण करण्यात आले आहे. भारतात प्रथमच अशा प्रकारचा उपक्रम राबविला गेला आहे. या सर्वेक्षणात १९ हजार ३०७ भटके श्वान आणि ५ हजार ८० भटक्या मांजरीची नोंदणी केली आहे.




भटक्या श्वानांमुळे निर्माण होणाऱ्या समस्यांवर उपाय योजना करण्यासाठी या सर्वेक्षणातून मिळालेल्या माहितीचा उपयोग होणार आहे. भटक्या श्वानांवर नियंत्रण ठेवण्यासाठी ही माहिती उपयोगी पडणार आहे. हे महत्वपुर्ण सर्वेक्षण वैद्यकिय आरोग्य अधिकारी डॉ. आनंद गोसावी यांच्या मार्गदर्शनाखाली पशुवैद्यकिय अधिकारी डॉ. भगवान गीते व डॉ. मधुलिका लाड यांनी केले आहे.

या डिजीटल सर्वेक्षणातून मिळालेली माहितीचा वापर महापालिकेच्या पशु वैद्यकिय विभागाच्या वतीने भविष्यातील सूक्ष्म नियोजनासाठी करता येणार आहे. या सर्वेक्षणामुळे भटक्या श्वानाची नसबंदी झाली आहे की नाही हे कळणार आहे. या डिजिटल सर्वेक्षणात श्वान, मांजरीचा फोटो, जेंडर, वय, आरोग्याची स्थिती नमूद करण्यात आली आहे.

एखाद्या व्यक्तीस भटका श्वान चावल्यास या सर्वेक्षणातील माहितीमुळे तो श्वान कोणत्या परिसरातील आहे याचा शोध घेणे सहज शक्य होणार आहे.

महापालिकेने निर्बिजीकरणाचा कार्यक्रम २०१८ पासून हाती घेतला असुन या सर्वेक्षणांतर्गत एकुण ४४ टक्के भटक्या श्वानांचे निर्बीजीकरण करण्यात आले आहे. या सर्वेक्षणातून असे दिसून आले की प्रौढ श्वानांची संख्या १० हजार २७० एवढी आहे.

श्वान पिल्लांची संख्या सुमारे १८०० आहे. तसेच वयस्क श्वानांची संख्या १ हजार ४४० एवढी आहे. यावरून महापालिकेने हाती घेतलेला निर्बीजीकरण कार्यक्रमाचे यश दिसून येत आहे.

रेबीजचा प्रादुर्भाव टाळण्याच्या दृष्टीने महापालिकेने केलेले सर्वेक्षण महत्वपूर्ण ठरणार आहे. तसेच भटक्या श्वानांची संख्या नियंत्रणात आणण्यासाठी देखील या सर्वेक्षणाचा उपायोग होणार आहे.

# महाविकास आघाडी करणार उपोषण आंदोलन

## कंत्राटदाराच्या हव्यासापोटी नगरोत्थान अभियानांतर्गत १४० कोटीची कामे अडविली

**अक्षराज : संगीता वनकळस**

**दि.२६, धाराशिव :** नगरोत्थान महाअभियानांतर्गत धाराशिव नगरपालिकेस मंजूर झालेल्या १४० कोटी रुपयांच्या ५९ डीपी रस्त्यांची कामे कंत्राटदारांच्या हव्यासापोटी जाणूनबुजून अडवून ठेवल्याच्या निषेधार्थ आमरण उपोषण करणार असल्याचा इशारा महाविकास आघाडीच्या वतीने जिल्हाधिकार्यांना निवेदनाद्वारे दिला आहे.निवेदनात म्हटले आहे की, नगरोत्थान महाअभियान अंतर्गत धाराशिव नगर पालिकेला मंजूर झालेल्या १४० कोटी रुपये निधीच्या ५९ डीपी रस्त्यांची कामे मागील ९ महिन्यांपासून जाणूनबुजून रखडवून ठेवली आहेत.




या कामांना प्रशासकीय २३ फेब्रुवारी २०२४ रोजी मंजुरी प्राप्त झालेली असून, नियमानुसार ७ दिवसांत निविदा प्रक्रिया सुरू करून ३ महिन्यात प्रत्यक्ष कामाला सुरुवात करणे आवश्यक होते. परंतु अद्याप ही या कामांना सुरूवात झालेली नाही. ०६ जानेवारी २०२५ रोजी नागरीकांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर रस्त्याची कामे तात्काळ चालू करणेसाठी रास्ता रोको आंदोलन केले होते. त्या आंदोलनावेळी धाराशिव नगर परिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांनी सदर कामांचे निविदा प्रक्रिया अंतिम टप्यात असल्याचे व सदर कामे दिनांक २८ फेब्रुवारी २०२५ रोजी पर्यंत प्रत्यक्ष सुरू करणार असल्याचे लेखी पत्राद्वारे आश्वासन दिले. सदर आंदोलनामुळे ७ महिन्यापासुन रखडलेल्या निविदा उघडण्यात आल्या. परंतु सदरील निविदा प्रक्रिया कंत्राटदारांच्या हव्यासापोटी १५ ते १६ टक्के जास्तीच्या दराची निविदा मंजुर करण्यासाठी सत्ताधारी लोकप्रतिनिधींच्या आडून कंत्राटदार नगर पालिका प्रशासनावर दबाव आणत आहेत. सदर कामे ही नगरोत्थान योजनेतील असल्याने २५ टक्के हिस्सा नगर पालिकेला भरावा लागतो. ह्या १५ ते १६ टक्के आगाऊची निविदा मंजूर केल्या तर विनाकारण नगर परिषदेवर जवळपास ३५ ते ४० कोटी रुपयांचा अतिरिक्त बोजा पडणार आहे. त्यामुळे कंत्राटदारांना कार्यारंभ आदेश देऊन सदरील कामे तत्काळ सुरु करण्याबाबत मुख्याधिकारी नगरपरिषद धाराशिव यांनी आदेशित करावे. अन्यथा महाविकास आघाडीच्या वतीने दिनांक १५ एप्रिल २०२५ रोजी सकाळी जिल्हाधिकारी कार्यालय, धाराशिव समोर आमरण उपोषण करण्यात येणार असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

यावेळी शिवसेना शहरप्रमुख सोमनाथ गुरव, काँग्रेस शहराध्यक्ष अग्निवेश शिंदे, प्रशांत पाटील, प्रवीण कोकाटे, रवि वाघमारे, राजाभाऊ पवार,प्रदीप मुंडे,उमेश राजेनिंबाळकर, राष्ट्रवादी युवक जिल्हाध्यक्ष शेखर घोडके, खलील सय्यद, सिद्धार्थ बनसोडे, प्रशांत साळुंके, बंडू आदरकर, गणेश खोचरे, पंकज पाटील, मिनिल काकडे, तुषार निंबाळकर, इस्माईल शेख, धनंजय राऊत, सुमित बागल, नीलेश साळुंके, जयंत देशमुख, सुनील वाघ, कालिदास शेरकर, यशवंत शहापालक, नवज्योत शिंगाडे, नाना घाटगे, मुजीब काझी, संभाजी दळवी, अजित बाकले, हणमंत देवकते, दिनेश बंडगर, सह्याद्री राजेनिंबाळकर, अजिंक्य राजेनिंबाळकर, साबेर सय्यद, योगेश सोन्ने पाटील, ॲड.आडे, अभिजित देशमुख, धनंजय पाटील, राम साळुंके, महेश उपासे, अमर गुंड, गणेश राजेनिंबाळकर, प्रशांत पाटील, विनोद केजकर, ईस्माइल काझी, बिलाल कुरेशी, अमोल नाईकवाडी, भीमराव चव्हाण, औदुंबर पांचाळ, अक्षय जोगदंड, अभिषेक पाटील, विजय माकुरवार, अशोक बनसोडे,बाळसाहेब जेवे, दत्तात्रय गोरे, सौरभ गायकवाड यांच्यासह शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# थोडक्यात

## शिल्पा बन्सोड यांना महापौर पुरस्कार



**अक्षराज : प्रभाकर हजारे**

**दि.२६, मुंबई :** बृहन्मुंबई महानगरपालिके द्वारे दिल्या जाणाऱ्या व अत्यंत प्रतिष्ठेचा समजला जाणाऱ्या महापौर आदर्श शिक्षक पुरस्काराचा नुकताच आण्णाभाऊ साठे सभागृहात वितरण सोहळा संपन्न झाला. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या लिंबूणीबाग मराठी शाळेच्या चित्रकला शिक्षिका शिल्पा बन्सोड यांना महापालिकेचे अति.आयुक्त अमित सैनी, शिक्षण उपायुक्त डॉ प्राची जांभेकर, आणि शिक्षणाधिकारी राजेश कंकाळ यांच्या शुभहस्ते या वर्षीचा महापौर आदर्श शिक्षक देऊन गौरविण्यात आले.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शिक्षण विभागामार्फत दरवर्षी पन्नास शिक्षकांना महापौर आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन गौरविण्यात येते. त्यात महापालिका शाळेच्या उत्कृष्ट काम करणाऱ्या प्राथमिक विभागाच्या चाळीस तर माध्यमिक विभागाच्या दहा शिक्षकांना सन्मानित करण्यात येते. या वर्षी ज्या पन्नास शिक्षकांना महापौर पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. त्यात एम पूर्व-१ या विभागातील लिंबोणीबाग मराठी शाळा क्रमांक १ येथे कार्यरत असलेल्या व आपल्या कार्यकुशलतेने ननावलौकिक कमावलेल्या चित्रकला शिक्षिका शिल्पा बन्सोड यांचाही समावेश आहे.उच्च शिक्षित असलेल्या शिल्पा बन्सोड यांची महानगरपालिकेच्या शिक्षण विभागात एकूण सतरा वर्षे सेवा पूर्ण झाली असून त्यांनी आतापर्यंत अनेक विद्यार्थ्यांना चित्रकलेचे मार्गदर्शन करून अनेकाना चित्रकार, आर्किटेक्चर बनण्यासाठी प्रोत्साहन दिले आहे. महाराष्ट्र शासनातर्फे दरवर्षी घेण्यात येणाऱ्या एलिमेंट्री, इंटमिजीएट ग्रेड परीक्षेत त्यानी मार्गदर्शन केलेल्या अनेक विद्यार्थ्यांनी चांगले ग्रेड मिळवून आपले नावलौकिक केले आहे. शिल्पा बन्सोड यांच्या कामाची दखल घेऊन मुंबईतील अनेक नामांकित संस्थांनी त्यांना आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित केलेले आहे. यावेळी अकरा हजार रुपयांचा धनादेश, आकर्षक ट्रॉफी, मेडल आणि शॉल व पुष्पगुच्छ देऊन शिल्पा बन्सोड यांना मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. त्यांच्या यशस्वी कारकिर्दीला महापौर पुरस्काराच्या माध्यमातून मिळालेल्या कौतुकाबद्दल शिल्पा बन्सोड यांच्यावर सर्व स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## वडगाव निंबाळकर पोलीस स्टेशन हद्दीमध्ये दंगा काबू राखण्याची रंगीत तालीम



**अक्षराज : शरद भगत**

**दि.२६, वडगाव निंबाळकर :** नागपुर येथे नुकत्याच घडलेल्या दंगली ची दखल घेत तसेच सुरु असलेल्या रमजान ईद व गुढीपाढवा सन याचे गांभीर्य लक्षात घेऊन वडगाव निंबाळकर पोलीस स्टेशन ने दंगा काबू कसा करावा ?दंगा झाला तर पोलीसांनी कसा हतळायचा या संदर्भात रंगीत तालीम १ तास घेण्यात आली .या तालमी मध्ये सहाय्यक पोलीस निरिक्षक सचिन काळे यांच्या उपस्थितीत संपन्न झाला .रंगीत तालीम साठी १ पोलीस उपनिरिक्षक तसेच पोलीस अंमलदार १४ असा स्टाफ उपस्थित असल्याचे सहाय्यक पोलीस निरिक्षक सचिन काळे यांनी सांगितले.

## वीज बिलाच्या वसुलीसाठी आता ‘दामिनी’ मैदानात

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२६, अमरावती :** वीज बिल भरण्यास टाळाटाळ करणाऱ्या बड्या ग्राहकांकडील विजेचे बिल वसूल करण्याची जबाबदारी महावितरणच्या दामिनींनी घेतली असून त्या कारवाईसाठी थेट ग्राहकांच्या दारात पोहचत आहेत. चालू आर्थिक वर्षाचे केवळ ५ दिवस शिल्लक आहेत आणि अजूनही १२४ कोटी पैकी ३६ कोटीचे वीजबिल वसूल होणे बाकी असल्याने महावितरणच्या दामिनी वसूलीसाठी सरसावल्या आहेत.

घरी कोणी नाही, म्हणून महावितरणच्या वसुली पथकाला दाद न देणारे ग्राहक आणि दहा हजारापेक्षा जास्त रूपयाची थकबाकी असणारे ग्राहक दामिनीच्या ‘रडार’वर आहेत. दामिनीकडून थेट वीज मीटर जप्तीची कारवाई करण्यात येत आहे. मुख्य अभियंता ज्ञानेश कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनात आणि अधीक्षक अभियंता दीपक देवहाते यांच्या पुढाकाराने जिल्ह्यातील चारही विभागात दामिनी पथकाची निर्मिती करण्यात आली आहे. एका दामिनी पथकात अतिरिक्त कार्यकारी अभियंता, उपकार्यकारी अभियंतासह १० महिला अभियंता, कर्मचारी सहभागी असून त्यांच्या मदतीसाठी सुरक्षा रक्षक आणि कारवाई सुरू असलेल्या वितरण केंद्रातील तंत्रज्ञाचा समावेश आहे. यासोबतच वरिष्ठ व्यवस्थापक वित्त व लेखा विजय पचारे, व्यवस्थापक विकास बांबल व लेखा विभागाकडून बिलासंबधी तक्रार असल्यास ती सोडविण्यासाठी ताबडतोब प्रयत्न करण्यात येणार आहे. जिल्ह्यात घरगुती, वाणिज्यिक, औद्योगिक आणि इतर वर्गवारीतील वीज ग्राहकांकडून जिल्ह्यात ३६ कोटी थकबाकी वसूल करावयाची आहे, त्यामध्ये अमरावती शहर विभागातून १७ कोटी, अमरावती ग्रामीण विभाग ६ कोटी, मोर्शी विभाग ३ कोटी आणि अचलपूर विभाग १० कोटी अजूनही वसूल होणे बाकी आहे.

### ..तर होणार गुन्हा दाखल

वीज बिल थकित असलेल्या ग्राहकावर वसुलीकरिता कारवाई सुरू केली आहे. कारवाई दरम्यान ग्राहकांनी अडथळा आणल्यास त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्याचे तसेच, कारवाई दरम्यान ग्राहकांकडे वीज चोरी आढळल्यास त्या ग्राहकावर विद्युत कायद्याअंतर्गत वीज चोरीचा गुन्हा दाखल करण्याचे दामिनी पथकाला निर्देश देण्यात आले आहेत. त्यामुळे थकबाकीदार ग्राहकांनी महावितरणच्या दामिनी पथकाला वीज बील त्वरित भरून सहकार्य करावे आणि कटू कारवाई टाळावी, असे आवाहन करण्यात येत आहे.